वि. ना. फणसळकर,
कराड.

ललितलहरी

# बाहुलीचें लग्न

★

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले,

कऱ्हाड २६ एप्रिल १९२२

प्रकाशक :-
पुरुषोत्तम पांडुरंग गोखले
४३६ सोमवार पेठ,
कऱ्हाड.

( सर्व हक्क लेखकाधीन )

मुद्रक :-
वि. रा. नावडीकर
श्रीदत्त प्रि. प्रेस,
कऱ्हाड.

# बाहुलीचें लग्न.

मानवतेच्या मधुर मुळीं ।
[ निर्मलतेच्या तरळ तळीं । ]
बागडणाऱ्या गोड मुली ।।
आनंदाच्या मूर्ति भल्या ।
आनंदांतच ज्या रमल्या ।।
जबाबदारी
जयां न न्यारी
मजा करोनी मजा विणें ।
मजाच ज्यांचें होय जिणें ।। १ ।।

ज्यांच्या गाना स्वर न लगे ।
काव्य न ज्यांचें शब्द बघे ।।

अर्थ नुमजतां ज्या लिहिती ।
अशब्द काव्यें रोज किती ।।

विश्ववांगमयीं
सुंदर काव्यीं

शब्द, ध्वनि, संकेत, तऱ्हा ।
मूकापुढती रद्द खऱ्या ।। २ ।।

गोजिरवाण्या अशा कळ्या ।
एके ठायीं जमलेल्या ।।

नुमलुनि गेल्या उमलोनी ।
परस्परांना पाहोनी ।।

सूर्या बघतां
रस रविकान्ता

वारा भेटीला येतां ।
पुष्प गंध दे त्यास स्वतां ॥ ३ ॥

जमवुनि अपुलें मेतकुट ।
तयीं ठरविलें कांहिं चट ॥
यंत्राच्या चाकांसम त्या ।
घेउं लागल्या पळि फिरक्या ॥
चुली मांडुनी
दिला उडवुनी
संसाराचा नव थाट ।
एका क्षणिं बिनबोभाट ॥ ४ ॥

बाल्यांतिल हा प्रौढपणा ।
प्रौढपणीं घे बालपणा ॥

विचार दे हा ताप मना ।
त्यास शांतवीं प्रभु पवना ! ॥

क्षणीं सुखाच्या
आनंदाच्या

हवी कशाला विषण्णता ? ।
बाल्य–गुलाबीं नच कांटा ॥ ५ ॥

अग्नीवाचुनि अन्न शिजे ।
पाण्यावाचुनि हात भिजे ॥

भर दिवसांही हो रात्र ।
अन्नावाचुनि सुरुं सत्र ॥

संबंधाविण
तो ये होउन

क्षुल्लक मातीही तेथें ।
सोनेंमोलानें विकते ।। ६ ।।

घटोत्कची ही सृष्टि नव्हे ।
बघतां बघतां जी फसवे ।।

सृष्टि असे ही भावाची ।
मोदीं मुरल्या हृदयाची ।।

हृदय–भावना
घडवी घटना

विधिलाही जी शक्य नसे ।
प्रभुला पाजुनि पुण्य पिसें ।। ७ ।।

हृदयभावना वज्र दुजें ।
बुद्धिवाद तो तेथ थिजे ।।

विचार कर्तृत्वा नाशी ।
हलवि भावना गुरु गिरिशी ।।

हृदय–भावना
देत चालना

बालांच्या त्या संसारा ।
मोदच भरला जिथें खरा ।। ८ ।।

आनंदाच्या बागेंत ।
वसंत ये मग बागडत ।।

आंब्यावाचुनि होय पन्हें ।
गुऱ्हाळ नसतां रसपानें ।।

रसावाचुनी
गुऱ्हाळ करुनी

प्रौढपणा घे करुनि हंसें ।
बाल्य लावितें ह्मणुनि पिसें ।। ९ ।।

एक बालिका दुसरीला ।
सविनय करिते विनतीला ।।
पदरीं घ्या मम पोरीला !
— त्या चिंध्यांच्या बाहुलिला ! — ।।

प्रौढपणा जधिं
मुलीस चिंधी

समजुनि लावी बाट तिची ।
नसते स्मृति या खेळाची ।। १० ।।

शक्य न होणें बाल पुन्हां ।
होण्या जरि ये नित पान्हा ।।

तृप्त जरी मी रसिक बनें ।
काव्य न नशिबीं जर होणें ।।

पिक न जरी मी
श्रोता नामी

साखर जरि ना तरि मुंगी ।
बनतां होइन धन्य जगीं ।। ११ ।।

लटोपटीच्या त्या विहिणी ।
हीन न बनल्या लटपटिनीं ।।

करुनि तयारी लग्नाची ।
माय मुलाची नच नाची ।।

माय मुलाची
माय मुलीची

माया करिती परस्परां ।
जोड जिला न जगीं जरा ! ॥ १२ ॥

बालांचा तो आइपणा ।
कौतुकिं खुलवी मदिय मना ॥

उच्छृंखलतेमध्यें हें ।
नटलें गांभीर्यच आहे ॥
विरोध नसतां
भासे परता
काव्यगुणाची कमाल ही ।
महती पावे इनें मही ॥ १३ ॥

हुंड्यापांड्याचा हट्ट ।
बसला घेउनियां हट्ट ॥

मुकेपणाच्या वाजंत्री ।
झडुनी कानां तोषविती ॥

रुसवा–फुगवा
नव्हता नांवा

मजा लुटावी सकलांनीं ।
बाल्य मजेची मधु खाणी ॥ १४ ॥

मुहूर्त धरुनी मनचाच ।
लग्न लागलें मग साच ॥

मंगलाष्टकें हवीं कशा ? ।
मंगल भरतां सर्व दिशां ॥

मंगलतेच्या
भागीरथिचा

धोत सारखा वाहतसे ।
अमंगळाला वाव नसे ॥ १५ ॥

मिळतां राजाला राणी ।
खुलल्या खेळांच्या राणी ॥
पंगत बसली लग्नाची ।
साधेपणच्या थाटाची ॥
भात--चुरमुरे
लाडु--हरबरे
शिपा--चांदीचीं ताटें ।
कुबेर लाजे या थाटें । १६ ॥

वरात होतां एकसरें ।
नांव ठेवुनी लग्न सरें ॥
ठेवा नांवच येथ कसें ? ।
वरात वधुपक्षीय नसे ॥

" चट्टामट्टा
बाळंभट्टा "
करुनि शेवटीं खेळ सरे ।
जेथें तेथें सुख पसरें ॥ १७ ॥

जोंवर कांहीं ना कळत ।
वयांत असते समजूत ॥
समज वयामधि जों येई ।
समजूतीचें वय होई ॥
आजकालच्या
या जगताचा
अनुभव आहे हाच मुळीं ।
फुलाहुनीही वंद्य कळी ॥ १८ ॥

★